# विदेशी गुंतवणूक आणि भारतीय अर्थव्यवस्था

**मृणालीनी फडणवीस**

माजी कुलगुरू

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**गोषवारा:**

भारतीय अर्थव्यवस्थेत विदेशी गुंतवणुकीचे विविध प्रकार विकासासाठी कसे वापरले आहेत व त्याची पुढील वाटचाल कशी असेल यावर सातत्याने चर्चा होतांना दिसते. भारताला विकसनशील उदयोन्मुख ते विकसित देश होण्यासाठी जे प्रयत्न करावे लागतील त्यात विदेशी गुंतवणूक वाढविणे, तसेच ती वाढवतांना कोणत्या क्षेत्राला अधिक प्राधान्य द्यावे इत्यादी विविध बाबी महत्त्वाच्या ठरतात. त्यादृष्टीने प्रस्तुत लेखात भारतातील विदेशी गुंतवणुक व त्यासोबतच मानवी गुंतवणुकींचा देखील आढावा घेण्यात आलेला आहे.

**बीज शब्द:** विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI), मानवी संसाधन गुंतवणूक, भारतीय अर्थव्यवस्था

**प्रास्ताविक:**

गेल्या अनेक वर्षापासून भारतीय अर्थव्यवस्थेत विदेशी गुंतवणुकीचे विविध प्रकार विकासासाठी कसे वापरले आहेत व त्याची पुढील वाटचाल कशी असेल यावर सातत्याने चर्चा होतांना दिसते. सध्या चर्चेचा सूर असा आहे की २०२३ मध्ये भारतात गुंतवणूक करणारे देश, विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI equity) मोठ्या प्रमाणात करीत आहेत. जर अमेरिकन मिलियन डॉलर्समध्ये पाहिलं तर ह्या वर्षात (२०२३) मध्ये सिंगापूरने सर्वाधिक १७२० US मिलियन डॉलर्स FDI equity माध्यमातून गुंतविले आहे, ती भारतातील एकूण गुंतवणुकीच्या २३% आहे. या गुंतवणुकीचे काही धोके असू शकतात असे वित्तीय क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात. ही गुंतवणूक जर फक्त शुद्ध स्वरुपाची असेल, ह्यातून काही फायदा अल्पकाळात काढता येत नसेल तर दीर्घकाळात बरेच चढ-उतार येऊ शकतात. त्यात कर्जात वाढ, मुद्रा स्फीति, निर्यातीवर परिणाम दिसू शकतात. चीनच्या तुलनेत भारतात मात्र सिंगापूरची गुंतवणुक अधिक आहे. हा बदल पाहावयास मिळतो तसेच भारतात स्टार्ट-अप, स्वयंरोजगार आणि डिजीटल क्षेत्रात वाढ होण्याची आवश्यकता आहे.

ह्या वर्षी अमेरिकेकडून ६०४० तर मॉरीशस कडून ६१३४ यूएस मिलियन डॉलर्स FDI Equity ची गुंतवणूक झाली आहे. अमेरिकन म्हणतात की प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीकरिता सध्या भारत हा सर्वाधिक पसंतीचा आणि महत्त्वाचा देश आहे. FDI हे प्रामुख्याने भारतातील DPIIT (डिपार्टमेंट ऑफ प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटरनॅशनल ट्रेड) जे FEMA कायद्यांतर्गत येते, त्यातूनही हेच दिसून येते.

या गुंतवणुकीतून २०२३-२४ मध्ये भारताचा सकाळ राष्ट्रीय उत्पाद ५.७% होईल असा विश्वास अमेरिकन तज्ज्ञ व इअत अभ्यासू संस्थांनी

व्यक्त केला आहे. G-२० मुळे हे अधिक वाढेल आणि भारतात अशी गुंतवणूक उपयुक्त ठरेल असे समजल्या जात आहे. रसायन संबंधी क्षेत्र, आरोग्य सेवा, विमा इत्यादी मध्ये वाढ होईल अशी अपेक्षा आहे. जेथे असे लक्षात येते की सेवा क्षेत्र अधिक सुदृढ होईल अशी व्यवस्था आहे तिथे उद्योग व संबंधित मुलभूत विकासाचा मुद्दा अधोरेखित नाही.

या संदर्भात क्रिसिल, इंडीया ब्रीफिंग व इतरही काही संस्थांनी विश्लेषण केले आहे. त्यामध्ये भारतात FDI ची सर्वाधिक आवक जर आपण क्षेत्रनिहाय बघितली तर ती संगणक सॉफ्टवेअर व हार्डवेअर, इतर सेवा क्षेत्र, व्यापार आणि संरचना बांधणीसाठी केली जात आहे. ही आवक व प्रवाह २०२१ ते २०२३ मध्ये अधिक वाढला आहे. दूरसंचार व्यवस्थेसाठी २०००ते २०२२पर्यंत बराच प्रवाह वाढला आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये ही वाढ इअतर राज्यांच्या तुलनेत अधिक असून ती सातत्यपूर्ण असल्याचे दिसते. भारतात होणाऱ्या FDIच्या वरील उल्लेखित क्षेत्रात महाराष्ट्राचा वाट २९%, कर्नाटक, गुजरात आणि दिल्लीचा वाटा २४% आहे. त्यानंतर तामिळनाडू, हरियाना, तेलंगाना, राजस्थान यांचा नंबर लागतो.

सिंगापूर, मॉरीशस, अमेरिकेच्या खालोखाल निदरलॅण्ड, जपान, यू.के., सायप्रस, कायमन आयलॅण्ड यांच्याकडून देखील FDI चा प्रवाह २०२३पर्यन्त वाढला आहे. भारताची प्रगती व विकास याबद्दल विश्वात चर्चा चालू असतांना आपल्याला प्रत्यर्क पूल अतिशय सावधगिरीने टाकत राहणे आवश्यक आहे. भांडवलवादाच्या प्रवाहात सर्वच देश आहेत. आपण भांडवलवादाच्या प्रक्रियेत खाजागीकारनाकडे जाण्याचा प्रयोग १९९१ सालापासून चालू ठेवला आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया ह्याच काळापासून सुरु झाल्याने त्याचे साधक-बाधक पडसाद आपण सर्वांनी चाखले आहेत. काही दिशा बदलत जात आहे. वरील उल्लेखित गुंतवणुकीचे प्रकार व स्वरूप बदलत आहे तरी देखील विकसित देशांचे जगावर वर्चस्व अधिकच आहे.

विदेशी गुंतवण याचा व्यापक अर्थ या लेखात घेण्याचा प्रयत्न केला आहे. आतापर्यंत आपण व्यापार विदेशी प्रत्यक्ष गुंतवण,काही उद्योगामध्ये विकास, मूळ संरचनात्मक विकासासाठी योजना व गुंतवण याबद्दल पहिले. काही दशकांपासून मानवी विकासाठीतील गुंतवण हा देखील महत्त्वाचा विशय ठरलेला आहे

**मानवी संसाधने व गुंतवण**

अलीकडेच, आपले मा. केंद्रीय शिक्षण मंत्री अमेरिकेच्या मेटा कम्पनीच्या वर्तमान अध्यक्ष (ग्लोबल अफेयर्स) निक क्लेग यांना भेटले. क्लेग हे यू.के. चे पूर्व उप-प्रधानमंत्री होते. आपल्याकडून असा प्रस्ताव मेटा कंपनीला आहे की उद्योजकता, डिजिटल भारत व कॉशल्य भारत या आपल्या धोरणांना अधिक बळकट करण्यासाठी मेटाने मदत करावी. भारतात डिजिटल संक्रमन चालू झाले आहे आणि ते अधिक मजबूत होण्यासाठी भरपूर मदत अमेरिकेची मेटाची होऊ शकेल असे दोघांचेही मत आहे. ही घटना आताची आहे.

पण गेल्या १०-१५ वर्षापासूनच्या अश्या घडामोडीची आपण चर्चा करू या. ज्यात आपले नवयुवती व युवक या समृद्ध देशाकडे फक्त खेचल्याच गेले नाही. तर तिथलेच झालेले आहे. ही एक मानवी गुंतवणुकच नाही का? तर एक मोठी

उलाढाल असून आपण सर्वत्र ऐकतो कि मोठया प्रमाणात आपले अभियांत्रिक तंत्रज्ञान विशेषज्ञ व संबंधित डिजिटल व्यासपीठ भरताचेच नागरिक चालवत आहेत. सॉफ्टवेअर डेव्हलपर्स म्हणून ओळखले जाणारे भारतीय तरूण, विश्लेषक म्हणून ओळख असणारे व इतर असे 2023 मध्ये एकूण 5.2 मिलियन लोक अमेरिकेत राहतात. कोव्हिड काळामध्ये काही व्हिजा समस्या आल्या तरी देखील ही संख्या, जी 2017 ला 2.75 मिलियन होती ती आता त्याच्या दुप्पट झाली आहे. भारतासकट इतर देशातील तरूण वर्ग डिजिटल इण्डिया, फॉर्मसी, नॅनो टेक्नोलॉजी यासाठी अमेरिका, कॅनेडा, यूरोपीय देश आणि आता ऑस्ट्रेलियाला धाव घेत आहेत. ज्याला बापण 'ब्रेन ड्रेन' या नावाने ओळखत होतो ती आतासुद्धा चालू आहेच; पण मानवी गुंतवण ही आपल्या माध्यमातून होवून त्या देशांच्या विकासाला कामी येत आहे. अशी गुंतवण ही मानव विकासासाठी आहे असे समजूया पण ती कोणाच्या फायद्याची व कशी याचा खोलात विचार व्हायला हवा.

अनेक विचार वेगवेगळया व्यासपीठावरून मांडले जात आहेत; जसे भारत आता तिसरी मोठी महासत्ता होणार, दरडोई उत्पन्न कितीतरी पटीने वाढणार! देशाची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रुपात प्रगती होत राहणार ही आनंदाची बाब आहेच. विकसित देशांमध्ये देखील प्रगती होत असतांना त्या देशांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाट वाढला आहे, परंतु दरडोई उत्पन्नातील तफावत मात्र कमी होण्याचे फार सकारातक चिन्ह दिसत नाही. 'गिग' अर्थव्यवस्थे प्रमाणे दिवसाचा पगार निश्चित करून उद्याची काळजी आहेच, हा प्रकार भारतामध्ये देखील वाढतो आहे.

असुरक्षित भविष्य आणि त्यामुळे मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणारे परिणाम यांचा सरळ सहसंबंध असल्याने, आपण विकास झाला आहे असे साजरे करू शकतो का? जर भारत त्याच धरतीवर वाटचल करत असेल तर आपण लवकरच तिसरी महासत्ता होऊ देखील पण प्रत्येकी दरडोई समाधान (प्रत्येकाला काम, कौशल्यानुसार पगार, शिक्षण, आरोग्य व वर सांगितल्या प्रमाणे डिजीटल सोयी मिळणे) प्राप्त होऊ शकेल का? असा प्रश्न उद्भवणे सहाजिकच आहे. शासकीय पद मिळणे आणि तेही भ्रष्ट्राचार विरहित गुणवत्तेनुसार भरणे आता दुर्मिळ झाले आहे, अशी स्थिती जेवढी वाढत जाईल तेवढे देशात अरिष्ट वाढणार. त्यामुळे इतर प्रगती बरोबच, नैतिक शिक्षण व आरोग्याशिवाय पर्याय नाही. अनैतिकतेचे उच्चाटन ही विकासाची खरी साथ असेल आणि मानवी भांडवलाचे उदयोन्मुख होण्याचे कारण देखील.

गिग अर्थव्यवस्थेचे अनुपालन आणि स्थै पगाराच्या नोकऱ्या यावर देखील सखोल विचारमंथन होण्याची आवश्यकता आहे. विदेशी मानवी भांडवल आपल्या देशात तुरळक प्रमाणात आहे, तर आपल्या देशातून मोठ्या प्रमाणात आपले उत्तम मनुष्य बळ विकसित देशात जायला पाहत आहे. म्हणजे मनी पॉवर ही साथ देते देशाचा विचार नंतर. आपण विकसित होऊ तर आपण विदेशी गुंतवणुकीबरोबर मानवी भांडवल खेचून आणू शकतो का? हा विचार करण्याचा विषय आहे. तसे करायचे असल्यास संपूर्ण शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल घडवून रोजगाराच्या संधी उपलबध करणे नव्हे, तर चांगले

राहणीमान द्यावे लागणार व चांगले मनुष्यबळ तयार करावे लागणार. भारताच्या शैक्षणिक प्रगतीवर प्रश्नचिन्ह आहे, त्याबरोबर इतर विकासाचा (कृषी, उद्योग, नवीन तंत्रज्ञान) आढावा घेत जाणे, सुधारणा करत जाणे, असा मार्ग जितका प्रशस्त होईल, तितक्या प्रमाणात समृद्धीचा मार्ग मोकळा होणार.

चीनचा विकास देखील अनेक प्रश्न निर्माण करणारा आहे. चीनचे बहुसंख्य युवा व मध्यम वयाचे व्यक्ति अगदी साधारण ते उच्च स्थान, पगारावर काम करण्यासाठी विकसित देश जसे अमेरिका, कॅनेडा, यूरोपातील काही देश, ऑस्ट्रेलिया या ठिकाणी जाण्याची पसंगी दाखवितात. ते फार चपळतेने व्यापर व सेवा क्षेत्रात पुढे येत आहे. तेव्हा त्यांची अर्थव्यवस्था कशी विकसित मानता येईल? जेव्हा त्यांचे मानवी साधन अधिक कमाईसाठी वर सांगितलेल्या देशांकडे जाण्याचा प्रयत्न करतात. त्यांची पूर्वीची लोकसंख्या नियंत्रणाची पद्धती 'एक कुटुंब एक अपत्य' जरी यशस्वी झाली असली तरी आता ते ह्या देशांमध्ये तीन-चार कुटुंम्ब एका मुलाला घर नेण्यासाठी शेती व बाहेरील जमीन विकत घेण्यासाठी मदत करत आहे. याचा उद्देश्य असा की ती प्रॉपटी चायनीज लोकांकडे आली पाहिजे. यासाठी ते मोठी किंमत मोजायला तयार आहेत. त्यामुळे या देशांचे नागरिक हा फायदा मिळविण्यात पुढे असतात. चीनच्या ह्या धोरणाचा परिणाम भविष्यात त्यांच्या जमा केलेल्या संपत्ती व श्रीमंतीला प्रभावित करून वर्चस्व स्थापित करू शकतो.

**भारतीची उंच भरारी कितपत समृद्धी देणारी !**

कोणत्याही देशाची वाटचाल किती ट्रिलियन डॉलर्स कडे जाते आहे या वर त्याची भरारी निश्चितच मोजल्या जाते पण सर्व प्राथमिक स्तराचे प्रश्न सुटले आहेत असे मात्र होत नाही. अमेरिका व चीन सारख्या देशांमध्ये देखील दारिद्र्य, बेरोजगारी, असमान उत्पन्न व संपत्तीचे स्वरूप, पर्यावरणाची बदलती परिणामें, इत्यादी समस्या आहेत. आपल्या जी.डी.पी. मध्ये होणारी वाढ़ किती लोकांपर्यंत झिरपत जाते याचा विचार प्रत्येक टप्प्यावर होणे आवश्यक आहे. विदेशी गुंतवणुकीचे स्वरूप हे भारताच्या आर्थिक विकासासाठी एक प्रमुख आर्थिक स्रोत मानल्या गेला आहेच. आपण तीन दशकापासून पाहतो की स्वस्त वेतन आणि भारतातील बदलल्या व्यावसायिक वातावरणाचा लाभ घेण्यासाठी विदेशी कंपन्या खाजगी व्यवसायात थेट गुंतवणूक करतात. असा भारत आत्मनिर्भर होऊ पाहत आहे. या साठी आपल्या देशातील मानवी संसाधन आणि बदलत्या व्यावसायिक वातावरणाचा लाभ आपल्या व्यावसायिकांना, गुंतवणूकदारांना कसा होईल याची काळजी घेणे किंवा त्यासाठी तयारी करणे अपेक्षित आहे. 1991 नंतर विदेशी प्रत्यक्ष गुंतवणीमध्ये सतत वाढ करून एक कोटी पेक्षा अधिक नोकऱ्या निर्माण केल्या गेल्या. त्यात कंत्राटी आणि काही काळ नोकरीसाठी पूर्ण वेळ कामावर घेण्याची योजना अधिक प्रचलित झाली.

17 एप्रिल 2020 रोजी, भारताने तेव्हांच्या कोव्हिड 19 साथीच्या आजारामुळे भारतीय कंपन्यांच्या संधीप्राप्त करून घेणारे टेक ओव्हर. अधिग्रहणांपासून भारतीय कंपण्याचे संरक्षण करण्यासाठी स्वतःचे थेट विदेशी गुंतवण धोरण बदलले; असे उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचे सांगणे आहे. नवीन FDI धोरण बाजारपेठेवर बंधने घालत नसले तरी, धोरणातून असे स्पष्ट होते की, सर्व प्रकाराची विदेशी गुंतवण

प्रामुख्याने FDI आता वाणित्य आणि उद्योग मंत्रालयाच्या छाननी समोर जाईल व त्यानुसार निर्णय होतील.

**सारांश :**

भारताने विदेशी गुंतवणीत सर्तकता बाळगली आहे हे दिसतय तरी आपल्याला आधिक बळकट होण्यासाठी पुढील मार्गाने देशात टप्प्या-टप्प्याने बदल आणून, इतर देशांवरचे अवलंबितव कमी करावे लागेल. दोन मार्ग ज्याद्वारे भारत FDI मिळवितो ती अशी आहेत -

**1. स्वयंचलित मार्ग :** या मार्गाने सरकार किंवा रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिच्या पूर्व वरवानगी शिवाय FD परवानगी आहे. तेव्हा ज्या राज्यांमध्ये अशी गुंतवण जाते जसे दिल्ली, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र यांच्या समग्र विकासाच्या आढावा घेत राहणे आवश्यक आहे. सध्यातरी डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री ॲड इंटरनल ट्रेड ॲड इन्व्हेस्ट इंडियाने इंडिया इन्व्हेस्टमेंट ग्रिड (IIG) विकसित केले आहे; जे परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन व सोयी सुविधा देण्यासाठी भारतीय प्रवर्गकांकडून प्रकल्पांचा संपूर्ण भारत डेटाबेस प्रदान करते.

**2. शासकीय मार्ग :** या मार्गाने शासनाची पूर्ण परवानगी आवश्कय आहे. या संबंधीचा अर्ज फॉरेन इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटेशन पोर्टलद्वारे करणे आवश्कय आहे. याला एकल खिडकी मार्गाच्या माध्यमाने सुलभ केल आहे. या पुढे अर्जाची तपासणी मंत्रालयाकडून होईल. आधीची सर्व मंडळे रद्द करून एफ.डी.आय साठी अर्ज प्रक्रिया करणे आणि त्यावर सरकारी मंजूरी ही सद्याचे एफ.डी.आय चे धोरण व FEMAच्या अंतर्गत कार्य करतील. वाणिज्य मंत्रालय, उद्योग आणि अंतर्गत व्यापार वाणिज्य मंत्रालयाच्या संवर्धनासाठी, विभागशी सल्ला घेवून संबंधित मंत्रालये किंवा विभागांद्वारे हाताळले जाते, ते अर्जाच्या प्रक्रियेसाठी मानक कार्यप्रणाली (SOP) निर्गमित करेल.

आपली प्रमुख क्षेत्रांमध्ये होणारी ही गुंतवण वाढत जाते आहे. त्यात पायाभूत सुविधा हा आघाडीचे क्षेत्र आहे. इलेक्ट्रोनिक सिस्टम डिझाइन आणि उत्पादन माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोटिव्ह, फार्मास्युटिकल्स, सेवा, रेल्वे, रसायने, कापड, विमान सेवा, एरोस्पेस ही प्रमुख क्षेत्रे आहेत.

वरील दोन मुद्यांप्रमाणे ही क्षेत्रे हाताळली गेली तर येणाऱ्या काहामध्ये प्रगती शक्य आहे.

**संदर्भ:**

1. टाइम्स ऑफ इंडिया, (2022). एफडीआय धोरणावर भारत ते चीन : एफ डी आय नियमांमधील बदल करारांचे उल्लंघन करत नाहीत, 22 एप्रिल 2022.

2. कॅबिनेटने विदेशी गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाला टप्प्या-टप्प्याने मंजुरी दिली“, pib.nic.in – 2 May, 2018.

3. एफडीआय वृत्तपत्र (पूर्वीचे SIA वृत्तपत्र) उद्योग व अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग, नोव्हेंबर, 2023 रोजी प्राप्त.

4. भारताची इलेक्ट्रॉनिक निर्यात 2025 पर्यंत 16 पटीने वाढून 180 अब्जपर्यंत पोहोचू शकते, 31 ऑगस्ट 2023

5. भारताच्या सुधारित एफडीआय धोरणाचा चीनचा निषेध: जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली, असे मत तज्ञांनी व्यक्त केले. फायनंशियल एक्स्प्रेस, २२ एप्रिल, २०२२.

***